Impact Factor-8575 (SJIF)

ISSUE No -
(CCCLXXIII) 373-A

ISSN-2278-9308

November-2022

B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

Vidharbha Youth Welfare Society, Amravati's

INDIRABAI MEGHE MAHILA MAHAVIDYALAYA, AMRAVATI

AND

AADHAR SOCIAL RESEARCH, DEVELOPMENT AND TRAINING INSTITUTE, AMRAVATI

ORGANIZE

ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE

ON

WOMEN'S CONTRIBUTION TO MODERN INDIAN SOCIETY

Date : 7th of November, 2022



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Dr.Leena Kandlkar
Principal
Indirabai Meghe
Mahila Mahavidyalaya.
Amravati. Maharashtra

Editor
Prof. Dr. Punam Choudhary
Convner
Indirabai Meghe
Mahila Mahavidyalaya.
Amravati. Maharashtra

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor-8575 (SJIF)

ISSUE No -
(CCCLXXIII) 373-A

ISSN-2278-9308

November-2022

B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

Vidharbha Youth Welfare Society, Amravati's

INDIRABAI MEGHE MAHILA MAHAVIDYALAYA, AMRAVATI

AND

AADHAR SOCIAL RESEARCH, DEVELOPMENT AND TRAINING INSTITUTE, AMRAVATI

ORGANIZE

ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE

ON

WOMEN'S CONTRIBUTION TO MODERN INDIAN SOCIETY

Date : 7th of November, 2022



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Dr.Leena Kandlkar
Principal
Indirabai Meghe
Mahila Mahavidyalaya.
Amravati. Maharashtra

Editor
Prof. Dr. Punam Choudhary
Convener
Indirabai Meghe
Mahila Mahavidyalaya.
Amravati. Maharashtra

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar PUBLICATIONS

INDEX

No.	Title of the Paper — Authors' Name	Page No.
1	स्त्रीवाद, स्त्रीवादी साहित्य : समिक्षा आणि वास्तव — अभिजीत झाडे	1
2	पंचायत राज संस्थांमधील महिला प्रतिनिधींचे सक्षमीकरण — डॉ. एच. पी. पारधी	6
3	भारतीय राजपूत विधवा महिलांची मध्ययुगकालीन व आधुनिक काळातील स्थिती — डॉ.अस्मिता ठोंबरे	12
4	भारतीय स्त्री जीवनाचे अध्ययन — प्रा. डॉ. नंदा पंढरीनाथ कंधारे	15
5	कॉन्ट्रीब्युशन ऑफ ॲनी बेझंट फॉर मेकिंग मॉडर्न इंडिया — प्रा.डॉ.दिलीप तुकाराम कदम	20
6	महिला सक्षमीकरण संकल्पना व महत्व — प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे	24
7	स्त्रीयांची आधुनिकतेकडे वाटचाल एक अन्वेषण — प्रा. सौ. प्रिया खोरगडे	27
8	आदिवासी स्त्रियांचे स्थान आणि समस्या — प्रा. डॉ. दयाश्री वि.कोकाटे	29
9	सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात महिलांचे योगदान — डॉ. कविता आर. बोरकर	31
10	क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणातील योगदान — पी. डब्ल्यु. पाटील	36
11	महिला सबळीकरणाकरिता राष्ट्रीय मिशन — प्रा.डॉ. रमेश के. शेंडे	40
12	श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनी स्त्री विकासासाठी केलेले कार्य एक अभ्यास — कु.गायत्री जवाहरलाल तेली , डॉ.मनीषा जगदीशलाल वर्मा	44
13	भारतीय महिलांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान — प्रा. डॉ. प्रफुल इ.ढोके	48
14	महिला सक्षमीकरणातील समाज सुधारकांचे योगदान — डॉ. वनिता न्या चोरे , उज्वला बाबुराव पवार	53
15	अमरावती जिल्ह्यातील जलव्यवस्थापनाचा महिलांच्या आरोग्यावर होणारा परिणाम — डॉ. प्रा. लिना कांडलकर , कु. मेघा तेलखडे	58
16	भारतीय राजकारणात महिलांची भूमिका — कुणाल दिलीप राठोड	64
17	राष्ट्र सेविका समितीचे महिला साबलीकरनातील योगदान — देविदास गुलाब चौधरी , प्रा.डॉ.धनंजय र.चौधरी	68

18	नारीवाद की प्रासंगिकता : सिध्दांत और व्यवहार प्रा. डॉ. आर. जी. बांबोळे	74
19	भारतीय राजकारणात महिलांची भूमिका — योगदान प्रा.डॉ.अर्चना उमरकर — घुलक्षे	79
20	बंजारा महिलांच्या आरोग्याविषयी समस्या व स्वच्छतेबाबत जागृकता डॉ. किशोर उत्तमराव राऊत , कु. गोदावरी विठ्ठल बन	84
21	क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे भारतीय साहित्यातील साहित्यिक योगदान. प्रा .सिद्धार्थ कुंडलिक इंगोले	89
22	स्त्रीभ्रूणहत्या संबंधित कायद्याविषयी महिलांची जागरूकता—एक विश्लेषणात्मक अध्ययन लुम्बिनी गणवीर , डॉ.सुनिता बाळापुरे	93
23	दलित स्त्री-प्रधान कादंबरी –एक अध्ययन डॉ. भूषण प्रदीप देशमुख , डॉ. वंदना स. भोयर	97
24	भारतातील स्त्रीची सद्यस्थिती मिनल गो.डिक्कर	101
25	स्त्रीवाद — उगम व विकास प्रा. डॉ. चांगुणा विठठ्ल कदम	105
26	अंगणवाडी सेविकांचे बालविकासामध्ये योगदान **कु. पुजा विनोदराव मामनकार , डॉ. प्रा. मंजिरी चेपे**	110
27	बॅक आणि औद्योगिक क्षेत्रातील महिलांचे योगदान डॉ. लिना कांडलकर , प्रिती रामकृष्ण भगत	113
28	एकविसाव्या शतकातील स्त्री: एक चिंतन डॉ. राम रौनेकर	117
29	आदिवासी स्त्रियांच्या समस्या **प्रिया साहेबराव खरबडे , डॉ. वंदना स. भोयर**	119
30	भारतातील स्त्रियांचाबदलता सामाजिक दर्जा: एक अध्ययन **Dr.Sujata Ramdasji Naik**	123
31	भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आदिवासी महिलांचे योगदान डॉ.सतिश हरलाल पारधी	126
32	पंचायती राज में महिलाओं की भूमिका और आरक्षण प्रा. डॉ. सुवर्णा विष्णू तायडे	131
33	महिलांचे खेळातील योगदान डॉ. मोनाली व्ही. इंगळे , डॉ.लीना सु. कांडलकर	133
34	ग्रामीण व शहरी मुलींच्या अभ्यासाविषयक सवयी व व्यक्तिमत्वाचे तुलनात्मक अध्ययन **डॉ. प्रा. लिना कांडलकर , कु. संगीता मधुकरराव पाटील**	139
35	रजोनिवृत्तीमुळे महिलांच्या शारीरिक क्षमतेवर होणा-या नकारात्मक परिणामाचे यौगिक समाधान शुभांगी प्रदीप खाळे , डॉ.सुनिल लाबडे	143

36	किशोरावस्थेतील मुलामुलींचे आरोग्य व आशासेविकांची भूमिका डॉ. सुनिता श्री. बाळापुरे , प्रा. सौ. धनश्री लोकचंद राणे	148
37	१९ व्या शतकातील भारतीय स्त्रीच्या सामाजिक सुधारणांचे प्रयत्न एक अभ्यास प्रो.(डॉ.) यशवंत साळुंके	151
38	महिला सुरक्षा आणि सायबर गुन्हे कु. प्रिया सुधाकरराव सगणे , प्रो.डॉ.सुनिता श्रीकृष्ण बाळापुरे	154
39	ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान प्रा. कांचन इंगोले (भोयर)	156
40	दर्यापूर शहरातील उद्योजक महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि कुटुंबाचा सहभाग - एक अभ्यास **डॉ.लिना सुनिल कांडलकर, प्रा.चंदा मंगेश खंडारे**	160
41	स्त्री उद्योजिका : भातीय अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ डॉ. प्रशांत म. पुराणिक	164
42	इंदिरा गांधी यांचे बँकांचे राष्ट्रीयकरण धोरण: एक अभ्यास डॉ.मारोती किशनराव जाधव	167
43	बालकाच्या विकासातील स्त्री ची भूमिका डॉ. सीमा अढाऊ	170
44	स्त्रीवादी साहित्यातील आधुनिक मराठी कवयित्री चे योगदान संगीता प्रकाश माने , डॉ. वंदना स. भोयर	174
45	गोंदिया जिल्हे के आदिवासी राजगोंड जमाती के शैक्षणिक आर्थिक तथा सामाजिक स्थिती का अध्ययन प्रा. सौ. अनिता संजय धुर्वे , डॉ. लीना सुनील कांडलकर	179
46	महिला सक्षमीकरण : संकल्पना आणि महत्व प्रा. डॉ.साधना डी. वाघाडे	184
47	डॉ.रजनी हजारे — एक अपराजिता प्रा.डॉ.ज्योती प्रमोद राखुंडे	189
48	महिलांच्या प्रगतीमध्ये शासकीय योजनांचा अभ्यास प्रा. डॉ. माधुरी अरविंद देशमुख	196
49	स्वयंसहाय्यता बचत गट आणि महिलांची उद्योजकता प्रा.कु. हेमलता आनंदराव उराडे	201
50	चिखली मतदारसंघ विकासाच्या शिल्पकार - आ. सौ. श्वेताताई महाले पाटील प्रा. डॉ. अनंत मदन आवटी	207
51	आधुनिक भारताच्या विकासात स्त्रियांचे योगदान राधिका सुभाषराव यादव , प्रा.डॉ. वंदना भोयर	217
52	स्त्री शिक्षणाची वाटचाल व सद्य:स्थिती प्रा.डॉ.सौ. वैशाली रा. मोरे	220

53	स्त्री मताधिकार : इतिहास आणि वास्तव — शशिकांत सर्जेराव माघाडे	223
54	इंदिरा गांधी यांचे बँकांचे राष्ट्रीयीकरण धोरण:एक अभ्यास — डॉ.मारोती किशनराव जाधव	228
55	ग्रामीण साहित्य आणि स्त्रीजीवन — प्रा.डॉ.सविता मा.पवार	231
56	महिलाएं और स्वास्थ्य — डॉ.प्रविणकुमार अ. मोहोड	238
57	महिलाओं के अधिकार और कानून — सोनाली रमेश खांडेकर	244
58	ग्रामीण महिलांची आरोग्य विषयक समस्यांच्या संदर्भातील जागरूकतेचा अभ्यास : विशेष संदर्भ बाळापूर तालुका — डॉ. अल्पना देवकर	249
59	भारतीय राजकारणात महिलांचे योगदान : एक दृष्टिक्षेप — प्रा. डॉ. संजय काळे	256
60	कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झालेल्या स्त्रियांच्या शारीरिक आरोग्यावर झालेल्या परिणामांचा आढावात्मक अभ्यास — प्रा. अरूणा वसंतराव तसरे , प्रा. डॉ. एस. डी. वाकोडे	260

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
mpact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 373 A (CCCLXXIII)
ISSN : 2278-9308
November, 2022

स्त्रीवाद – उगम व विकास
(Feminism Origion And Develpoment)

प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम
इतिहास विभाग, बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.
मोबाईल नं. ९५२७७९७६८६, ईमेल – kadamcv.78@gmail.com

प्रास्ताविक –

प्रत्येक विचारधारेला काही मुलभूत विचारांची बैठक असते आणि त्या विचारांच्या दिशेवरूनच तो वाद किंवा ती विचारधारा ओळखली जाते. एकोणिसाव्या शतकात शेवटच्या दशकात फ्रान्समधील स्त्रियांच्या मत हक्काच्या चळवळीत स्त्रीवाद या शब्दाचा प्रयोग पहिल्यांदा झालेला दिसून येतो. लगेचच अमेरिकेतील स्त्रियांच्या मत हक्काच्या चळवळीने तो उचलून धरला. स्त्रियांसाठी समान हक्क या ढोबळ अर्थाने हा शब्दप्रयोग सर्रास होऊ लागला. त्यानंतर पुढे कॅनडा, आफ्रिका या देशांतून स्त्रियांच्या हक्कांसाठी चळवळी उभ्या राहिल्या. या चळवळींमधून स्त्रीवादाच्या संकल्पना पुढे आल्या आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधात स्त्रीवादाच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, स्त्रीवादाचा अर्थ व व्याख्या, स्त्रीवादाची वैशिष्टये, स्त्रीवादाच्या विकासाचे टप्पे इ. मुद्यांचे चिकित्सक विश्लेषण केलेले आहे.

स्त्रीवादाच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी –

पाश्चात्य देशांचा सुरूवातीचा इतिहास पाहता स्त्रिया या फक्त चूल आणि मूल या कौटुंबिक व्यवस्थेत अडकलेल्या होत्या. त्यांना सार्वजनिक जीवनात स्थान नव्हते. तो पुरूषांचाच अधिकार समजला जाई. मध्ययुगात स्त्रियांना संपत्तीत वाटा नव्हता. तसेच शिक्षणाची संधीही नाकारण्यात आलेली होती. स्त्रियांचे सामाजिक स्थान, समाजजीवनातील त्यांचा सहभाग, त्यांचे विविध प्रश्न व समस्या इ. बद्दलचे विचारमंथन अठराव्या शतकात होऊ लागले. या विचारमंथनातून स्त्रीवादी विचारधारेचा उगम झाला. स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे राजकीय हक्क, समान संधी अशा अनेक प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले गेले.

एकोणिसाव्या शतकात स्थित्यंतराची, बदलाची मागणी युरोप व उत्तर अमेरिकेत होऊ लागली. पॅरिसमधील स्त्रीवादी महिलांनी 'द व्हाइस ऑफ विमेन' हे दैनिक सुरू करून स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली. स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे राजकीय हक्क, समान संधी, समान वेतन, कुटुंबांतर्गत आणि कुटुंबाबाहेरील हिंसाचार, श्रमविभागणी अशा बहुविध प्रश्नांकडे या दैनिकाने लक्ष वेधले आणि स्त्रीवादाची सैध्दांतिक भूमिका मांडली. स्त्रीवादाचा हा प्रसार प्रचार पाश्चात्य देशांतून आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेत प्रसृत झाला आणि विकसित राष्ट्रांबरोबरच त्याचे लोण अविकसित व विकसनशील देशात पोहोचले.

स्त्रीवादाचा अर्थ व व्याख्या –

स्त्रीवाद ही प्रामुख्याने पाश्चात्य विचारधारा आहे. मानवी इतिहासाच्या वाटचालीत स्त्री म्हणून स्वतंत्र अस्तित्व न मानता तिच्याकडे पुरूषकेंद्रित दृष्टिकोनातून पाहिले गेले. त्यामुळे संस्कृतीच्या प्रगतीमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान मिळाले. वंशनिर्मिती व वंशसातत्य यातील स्त्रियांची भूमिका नेहमीच मादी म्हणून राहिली. जवळजवळ सर्व समाजात पुरूषांच्या तुलनेत स्त्रीचे स्थान दुय्यम व भिन्न पुढेपुढे सवय होवून सर्वांनाच ते नैसर्गिक व योग्य वाटू लागले. कारखानदारी, यंत्रयुग आणि भांडवलशाही हे इतिहासाचे टप्पे मागे टाकून आपण भूतकाळात गेलो तर स्त्रियांच्या दुय्यम व कनिष्ठ दर्जाचे पुरावे मिळू शकतात. त्यामुळे पुरूषांच्या बरोबरीने जग घडविण्याचा अधिकार स्त्रियांना प्राप्त व्हावयाचा असेल तर स्त्री पुरूष विषमता कशी रूजत गेली हे अभ्यासणे महत्वाचे ठरते. "स्त्रीवादाने पुरूषप्रधानता हा स्त्रीला दुय्यम ठरविणारा प्रमुख मुद्दा आहे अशी मांडणी केली. पुरूषप्रधानतेच्या मुद्याच्या साहाय्याने स्त्रियांच्या दडपणुकीच्या प्रकारांचे मर्म शोधणे, इतिहास,

कायदा, धर्म, साहित्य, कला, सामाजिक चालीरीतींचे विश्लेषण करणे ही नवी दृष्टी स्त्रीवादाने विकसित केली."[१]

स्त्रीवादाचा अर्थ लक्षात घेतला असता असे दिसून येते की, " स्त्रीवाद म्हणजे लिंगभेद झुगारून स्त्री पुरूष समानतेकडे वाटचाल करणारा विचारप्रवाह."[२] स्त्रीवाद ही संकल्पना अस्मिता लढयातून उत्कांत झाली. कला, कायदा, रूढी, संस्था आणि लोकमत या सर्व स्तरांवर स्त्रियांना माणूसपणाचा हक्क प्राप्त होण्यासाठी जाणीवपूर्वक लढली जाणारी राजकीय, सामाजिक लढाई म्हणजे स्त्रीवाद होय.

स्त्रीवादाच्या विविध व्याख्या –

स्त्रीवादाविषयी अनेक समाजशास्त्रज्ञांनी, तज्ज्ञ समीक्षकांनी, तत्ववेत्त्यांनी व्याख्या केलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे –

स्त्री अभ्यासिका सुमती लांडे यांच्या मते, स्त्री पुरूषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार आणि पुनर्रचना म्हणजे स्त्रीवाद होय. प्रीती सदावर्ते यांच्या मते, स्त्रियांच्या एकूणच जीवनाविषयी समाजापुढे निर्माण झालेले प्रश्न, उपप्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारी मतप्रणाली म्हणजे स्त्रीवाद होय. रझिया पटेल यांच्या मते, स्त्रियांना स्वतंत्रपणे आपल्या हक्कांसाठी, आत्मसन्मानासाठी लढा देणे आवश्यक आहे हा लढा म्हणजे स्त्रीवाद होय.

सुमित्रा भावे यांच्या मते, " स्त्रीवाद हा वाद शब्दांमुळे बंदिस्त होतो. त्यामुळे स्त्रियांच्या समानतेसाठी केलेली चळवळ म्हणजे स्त्रीवाद होय."[३] पाश्चिमात्य संदर्भात स्त्रीवादी विचारप्रवाहाची मांडणी करणाऱ्या होल आणि लेव्हिन या स्त्रीवादी लेखिकांच्या मते, " स्त्रीवाद मुलतः जैसे थे वादाला शह देतो. सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक संस्थांना तसेच त्यांच्या विचार करण्याच्या पध्दतीला आणि विचार अभिव्यक्त करण्याच्या रीतीलाही तो मुलभूत प्रश्न विचारतो. "[४] लिंडागार्डन म्हणतात, पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रियांचे दुय्यमत्व व त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद होय. भारतीय संदर्भात पाश्चात्य स्त्रीवादाचा नेमका अर्थ कसा लावला गेला पाहिजे हा प्रश्न महत्वाचा आहे. भारतीय समाजाचे वास्तव लक्षात घेता एका अर्थाने आपला इतिहास नव्या दृष्टिकोनातून तपासून पाहण्याचा त्यातील अदृश्य स्त्री जीवनाचा सहभाग उलगडून पाहण्याचा हा प्रयत्न असलेला दिसून येतो.

भारतीय स्त्रीवादाच्या मांडणीचे पहिले श्रेय ताराबाई शिंदे यांना जाते. म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीच्या विचारांचा प्रभाव ताराबाई शिंदे यांच्यावर होता. स्त्री – पुरूष तुलना या निबंधातून त्यांनी स्त्री पुरूषांतील गुणावगुणांची चर्चा, स्त्री पुरूष समतेचे विचार, स्त्रीला स्वतंत्र, सन्मानाचे, हक्काचे आणि पुरूषांच्या बरोबरीचे स्थान, स्त्री वर्गाचे सर्वच स्तरावरील शोषण आणि पुरूषप्रधान संस्कृतीचा पगडा या संदर्भातील सुधारणावादी विचार म. फुल्यांपूर्वी प्रकट केलेले होते. स्त्रियांना निरंतर बंदिवानासारखे घरात कोंडून ठेवणाऱ्या पुरूषांना ताराबाई म्हणतात, " तुम्ही असे अटट्ल हुशार कोल्हे तरी इंग्रजी सरकारचे राज्य झाल्यापासून स्त्रियांना विद्यादान देऊन त्यांची मने नेहमी सर्व मानसिक व व्यावहारिक प्रसंगात धैर्याने राहण्यास पुष्कळ तऱ्हेने बळकट झाली आहेत. त्यामुळे त्यांचे हृदयात जे अज्ञान वसत होते, ते जाऊन त्यांना आता आपले बरे वाईट, कोणाशी कसे वागावे, हा संसाराचा गाडा कसा हाकावा, स्वधर्म, पातिव्रत्य, याविषयी चांगले समजू लागले व यामुळे भरतखंडाची स्थिती काही दिवसांनी अगदी बदलून जाईल."[५] शिक्षणाचा अर्थ व उपयोग ताराबाईंच्या दृष्टीने काय होताहे वरील परिच्छेदातून स्पष्ट होते.

टॉम बॉटमूर आणि इतरांनी संपादित केलेल्या 'ए डिक्शनरी ऑफ मार्क्सिस्ट थॉट' मध्ये स्त्रीवादाचा अर्थ आणि महत्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे. " स्त्रीवाद हा स्त्री पुरूष समानतेचा विषय आहे. असा युक्तिवाद एका बाजूने करता येतो. तर दुसऱ्या बाजूने स्त्रियांचे शोषण आणि पिळवणूक यांचा नाश केल्याशिवाय मानवी मुक्ती शक्य नाही. परंतु हे सर्व फक्त समाजवादी क्रांतीमधूनच प्रस्थापित होऊ शकेल असा विचार मांडला जातो."[६]

जाणीव जागृती ही स्त्रीवादाची मध्यवर्ती रणनीती आहे. विल्सन यांच्या मताप्रमाणे, स्त्रीवाद म्हणजे एकच एक सलग सिध्दांत असून अनेक सिध्दांतांचा त्यामध्ये समावेश होतो. ही केवळ स्त्रियांचे दुय्यमत्व नष्ट करण्यासाठी आलेली जागृती नसून स्त्रियांना त्यांच्या खऱ्या खुऱ्या श्रेयापर्यंत

जाण्याचा मार्ग सुकर करणारी राजकीय बांधिलकी आहे. व्हेलहन यांनी म्हटल्याप्रमाणे, स्त्रियांना बाईपणामुळे अन्याय सहन करावा लागतो. या गृहितकावर आधारित आपली भूमिका निश्चित केली आहे. स्त्रियांचे दुय्यमत्व हे व्यवस्थात्मक आहे आणि प्रत्येक संस्कृतीमध्ये स्त्रिया पुरूषांपेक्षा दुर्बल आहेत. थोडक्यात असे म्हणता येईल की, स्त्रीवाद हा अनेक सैध्दांतिक पातळया असणारा ज्ञानसमुच्चय आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रातील विषमता आणि शोषण नष्ट करणे हा स्त्रीवादाचा उद्देश आहे.

स्त्रीवादाची वैशिष्टये –

स्त्री व पुरूष या दोन घटकांनी बनलेल्या मानवी समाजव्यवस्थेत या दोन घटकात समानत्व नाही. पुरूषप्रधान व्यवस्थेने स्त्रीला गौण स्थान दिले आहे. या व्यवस्थेला स्त्रीवादाने आव्हान दिले आहे. डॉ. रचना माने यांनी अधोरेखित केलेली स्त्रीवादाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे –

१) स्त्रीवाद ही कृतीशिलतेची अपेक्षा असणारी विचारसरणी आहे.
२) स्त्रीवाद ही स्त्रियांच्या हितसंबंधांचा विचार करणारी विचारप्रणाली आहे.
३) स्त्रीवादाने पुरूषप्रधान व्यवस्थेतील पुरूषी राजकारण उघड केले आहे.
४) स्त्रीवादाने पुराणधर्मग्रंथातील स्त्रीच्या दुय्यम स्थानाला आव्हान दिले आहे.
५) स्त्रीचे दास्यत्व किंवा दैवत्व नाकारून तिला माणूस म्हणून ओळख निर्माण करून देण्याचा प्रयत्न स्त्रीवादाने केला.
६) स्त्रीवादाने ज्ञान परंपरा, साहित्य परंपरा, भाषा, शिक्षण, धर्म, कला, कायदा, अध्यात्म, नीतिव्यवस्था या घटकांचे स्त्रीच्या दृष्टिकोनातून पूनर्मूल्यांकन केले.
७) स्त्रीवादाने सांस्कृतिक लिंगभेद नाकारला.
८) पुरूषप्रधान व्यवस्थेतील पुरूषकेंद्री विचारप्रक्रियेमुळे समाजरूपी वर्तुळाच्या परीघावर राहिलेल्या स्त्रीला केंद्रस्थानी आणण्यासाठी लढा दिला.

स्त्रीवादाचा विकास –

स्त्री जीवनाचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, स्थिर कृषी संस्कृतीपासून पुरूषप्रधान समाजव्यवस्था अस्तित्वात येईपर्यंत स्त्रीला गौण स्थान दिलेले होते. तिचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल इतके मर्यादित होते. पुरूषाच्या अधिपत्याखाली राहून तिने घर सांभाळावे, त्याच्या मर्जीप्रमाणे आपले जीवन कंठावे अशा प्रकारची धारणा रूढ होती. या अवस्थेत स्त्रीला एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले जात होते. तिचा बौध्दिक आणि मानसिक विकास कुंठीत झाला होता. अशा अवस्थेत स्त्रीला मुक्त करण्यासाठीचा जो विचार पुढे आला त्यातून स्त्रीवादाचा जन्म झाला.

१९६० नंतर स्त्रीवाद एक विचारसरणी म्हणून पुढे आली. अर्थात स्त्रीवादात अभिप्रेत असणारा स्त्री पुरूष समानतेचा विचार गेल्या तीनशे वर्षात हळूहळू उत्क्रांत झाला आहे. ढोबळपणे स्त्रीवादी विचाराच्या विकासाचा अभ्यास तीन टप्प्यात केला जातो तो पुढीलप्रमाणे

स्त्रीवादी चळवळीचा पहिला टप्पा –

१९२० पूर्वीच्या स्त्रीवादी चळवळीला पहिल्या टप्प्यातील चळवळ म्हणून अभ्यासावे लागते. सर्वप्रथम मेरी वुलस्टोनक्राफ्टने ' दि व्हिंडिकेशन ऑफ राईट्स ऑफ वुमेन' या ग्रंथामध्ये स्त्री – पुरूष समानतेचा पुरस्कार केला. ही स्त्रीवादी चळवळीची सुरूवात होती. या कालखंडातील बहुतांश स्त्रीवादी मवाळ व परंपरावादी होते. स्त्री मताधिकार, कामाचा अधिकार, स्त्री – पुरूष समानता यांना अडथळा आणणाऱ्या कायद्यांना विरोध करण्याला या काळात भर दिला गेला. प्रामुख्याने अमेरिका, इंग्लंड, नेदरलॅंड, कॅनडा इ. पाश्चात्य देशांमध्ये ही स्त्रीवादी चळवळ मर्यादित होती.

स्त्रीवादाच्या विकासाचा दुसरा टप्पा –

१९२० नंतरच्या काळात जहाल स्त्रीवादाची मांडणी करण्यात आली. १९६० नंतर स्त्रीवादी चळवळीला अधिक गती मिळाली. या काळात केवळ स्त्री – पुरूष समानताच नव्हे तर स्त्रियांचे श्रेष्ठत्व सुध्दा अधोरेखित करण्यात आले. गर्भपात करण्याचा अधिकार, मुलांना जन्म देण्याचा अधिकार, कुटुंब व विवाहविषयक अधिकार याबाबत महिलांना स्वातंत्र्य असावे अशी मागणी करण्यात आली. घटस्फोटाच्या कायद्यातील भेदभाव विरोधी चळवळीचा हा कालखंड होता. या काळात धर्मनिष्ठ, पितृकेंद्री आणि पुरूषधार्जिण्या कायद्यांना विरोध केला गेला. या काळात स्त्रीवादी

चळवळीची व्याप्ती जगभर पसरली. सिमॉ दि बुव्हाने 'दि सेकंड सेक्स' मधून स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडली. स्त्री अस्मिता जागृत करण्याला प्राधान्य दिले.

स्त्रीवादाच्या विकासाचा तिसरा टप्पा –

१९९० नंतर स्त्रीवादी चळवळीचा तिसरा टप्पा सुरू होतो. वसाहतवाद आणि साम्यवाद यांचा शेवट आणि मुक्त अर्थव्यवस्थेची सुरूवात अशा काळात स्त्रीवाद विषयक नवीन दृष्टिकोन विकसित झाला. या काळात स्त्री स्वातंत्र्य किंवा स्त्री मुक्ती या संज्ञांचा अर्थ व्यक्तीसापेक्ष आणि स्थलसापेक्ष असावा असा विचार पुढे आला. प्रत्येक स्त्रीला तिच्या स्वातंत्र्याची व्याख्या करण्याची मुभा असावी कारण स्वातंत्र्य आणि समता या संकल्पना सापेक्ष आहेत. प्रगत पाश्चात्य देशाप्रमाणे आशिया आणि आफ्रिका खंडातील स्त्रियांना देखील त्या त्या समाजातील परिस्थितीनुसार पुरूषांच्या बरोबरीचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे , वर्णभेद, पिडित स्त्रियांच्या शोषणाविरूध्द जागृती निर्माण झाली आणि त्यांच्यावरील अन्यायाला स्त्रीवादाने वाचा फोडली. त्याचप्रमाणे समलिंगी संबंधांना लोकमान्यता मिळावी यासाठी प्रयत्न झाले.

अशा प्रकारे स्त्रीवादाच्या विकासाच्या पहिल्या टप्प्यात स्त्रीविरोधी कायदे व परंपरा यांच्याविरोधी चळवळी झाल्या. दुसऱ्या टप्प्यात पुरूषांप्रमाणे स्त्रियांना सर्व नागरी व राजकीय हक्क मिळावेत यासाठी प्रयत्न झाले. तिसऱ्या टप्प्यामध्ये स्त्री स्वातंत्र्याच्या व्यक्तिकेंद्रित विचाराला महत्व प्राप्त झाले. त्यामुळे स्त्रीवादाचे स्वरूप बदलत गेल्याचे दिसून येते. स्त्रीवादाचा निरनिराळ्या सिध्दांतांमधून आणि त्यांच्या परस्पर संबंधांमधून जो विकास घडला, त्यामध्ये स्त्रीच्या गौणत्वाला कारणीभूत ठरणाऱ्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, मानसशास्त्रीय घटकांचा सखोल विचार करण्यात आला. व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा व्यापक समाजहितासाठी त्याग करण्याची परंपरा भारतात असल्याने स्त्रीवादाची भूमिका भारतीय परिप्रेक्ष्यात पाश्चात्यांच्या विचारांपेक्षा वेगळी करण्याची गरज भासते. तरी अंतिमत: स्त्रीवादाचा साकल्याने विचार केल्यास स्त्री स्वातंत्र्य, स्त्री – पुरूष समता, व आत्मनिर्भरता या गोष्टी स्त्री उध्दारासाठी अपरिहार्य ठरतात.

सारांश –

अशा प्रकारे स्त्रियांना दुय्यमत्व देण्यामागे जे पुरूषी राजकारण आहे त्याचा बीमोड करणे हे स्त्रीवादाचे मूळ उद्दिष्ट आहे. स्त्रीवादांतर्गत अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो. पुरूषांइतकीच स्त्रीलाही स्वत:ची ओळख आहे. स्वविकास, स्वतंत्रता, स्वत्वाची ओळख, स्वायत्तता, स्वयंनिर्णय, सक्रिय सहभाग, या गोष्टी स्त्रीला व्यक्ती म्हणून परिपक्व बनवितात. आपल्या सांकल्पनिक, सैध्दांतिक चौकटीमध्ये स्त्रियांना मिळणारे गौणत्व, त्यांचे केले जाणारे दमन यांचे स्पष्टीकरण, त्यामागील कारणांचे विश्लेषण स्त्रीवाद करतो. त्याचप्रमाणे हे सामाजिक वास्तव बदलण्यासाठी काय करावे याचे विवेचनही करतो.

स्वातंत्र्यानंतर लगेचच भारतीय संविधानाने सर्वच क्षेत्रात स्त्रियांना समान संधी दिली. ही संधी अंमलात येईल हा विचार प्रबळ होत असतानाच समानतेच्या दिशेने या अहवालातील निष्कर्षाने समाजातील मुलभूत कल्पनांना धक्का बसला व भारतीय स्त्रियांच्या ढासळत्या स्थानाबद्दल चिंता करण्याइतपत परिस्थिती आहे हे सत्य पुढे आले. कारण १९५० ते १९७५ या कालखंडातील बरेच स्त्रीविषयक अभ्यास हे अभिजन वर्गापुरते मर्यादित राहिले होते. यामुळे भारतीय जीवनाचे सत्यस्वरूप १९७४ नंतर पुढे आले. १९७३ मध्ये मुंबई एस. एन. डी. टी. या महिला विद्यापीठात पहिल्या स्त्री अभ्यासकेंद्राची स्थापना झाली. या सर्वांमुळे १९७० च्या दशकात भारतातील स्त्री विषयक अभ्यासाची कवाडे उघडू लागली.

संदर्भ टिपा –

१. पद्मजा पाटील, शोभना जाधव, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती, मार्च, २००७. पृ. १०
२. शर्मिला रेगे, लेखसंग्रह, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९८. पृ. २५.
३. स्वाती देहाडराय, अनघा तांबे, (संपा.), स्त्रियांच्या चळवळी व संघटना, स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, २००९. पृ. १०.
४. विद्युत भागवत, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००८, पृ. ३३.

५. ताराबाई शिंदे, स्त्री पुरूष तुलना, सुमेध प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, २००४, पृ. १४.
६. प्रवीण बन्हाण, (अनु.), स्त्रीवादी सिध्दांकन आणि ज्ञाननिर्मिती, स्त्री अभ्यास केंद्र, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, जुलै, १९९९. पृ. ०७.
७. नारायण भोसले, महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण, द ताईचि प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००८.
८. मंगला बरखेडे, (संपा.), स्त्रीवादी समीक्षा:संकल्पना व उपयोजन, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे, प्रथमावृत्ती, १९९९.
९. स्वाती कर्वे, स्त्री विकासाचे नवे क्षितिज, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००८.